**ठळक बातम्या**

- जो देश आपला इतिहास जपतो, त्यांचं भविष्यही सुरक्षित असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं 'मन की बात' मध्ये प्रतिपादन

- महाराष्ट्रात सरकार स्थापनेसाठी राजकीय हालचालींना वेग, सत्तास्थापनेबाबत महायुतीत कसलेही मतभेद नसल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं स्पष्टीकरण

- झारखंडमधे नव्या सरकारचा शपथविधी येत्या २८ तारखेला

- उद्यापासून सुरु होणाऱ्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचं कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचं सरकारचं सर्वपक्षीय बैठकीत आवाहन

**आणि**

- कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचं ऑस्ट्रेलियासमोर ५३४ धावांचं आव्हान / यशस्वी जयस्वालच्या १६१ धावा, तर विराट कोहलीचं नाबाद शतक /दिवसअखेर ऑस्ट्रेलियाच्या ३ बाद १२ धावा

**<><><><><>**

जो देश आपला इतिहास जपतो, त्यांचं भविष्यही सुरक्षित असतं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमातून जनतेशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. हा या कार्यक्रमाचा ११६ वा भाग होता. देशातल्या गावांचा इतिहास जतन करण्यासाठी एक निर्देशिका तयार करायचा प्रयत्न सुरू आहे, प्राचीन काळातील सागरी

प्रवासाबद्दलच्या भारताच्या क्षमतेशी संबंधित पुरावे जतन करण्याची मोहीमही सुरू केली आहे. याच प्रयत्नांचा भाग म्हणून गुजरातमध्ये लोथल इथं एक संग्रहालय उभारलं जात असून, नागरिकांकडे कोणत्याही हस्तलिखिताची किंवा ऐतिहासिक दस्तऐवजाची प्रत असेल तर ती त्यांनी भारतीय राष्ट्रीय अभिलेखागाराच्या मदतीनं जतन करावी, असं आवाहन त्यांनी केलं. या वेळी प्रधानमंत्र्यांनी गयाना, ओमान, स्लोव्हाकिया यांसारख्या देशांसह इतरत्रही स्थलांतरीत झालेले भारतीय त्या प्रदेशांशी एकरूप होतानाही, आपला भारतीय वारसा आणि संस्कृतीच्या नोंदीकरणीसाठी करत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

डिजिटल अटक या प्रकाराची तरतूद अस्तित्वात नसून हे लोकांना फसवण्याचं कारस्थान असल्याचं प्रधानमंत्र्यांनी आज पुन्हा एकदा स्पष्ट केलं. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना, ज्येष्ठ नागरिक जास्त बळी पडतात. अशा परिस्थितीत त्यांना जागरुक करणं आणि सायबर घोटाळ्यांपासून वाचवण्यामध्ये मदत करणं ही आपली जबाबदारी असल्याचं ते म्हणाले.

एक पेड माँ के नाम या मोहिमे अंतर्गत अवघ्या पाच महिन्यात १०० कोटी वृक्ष लागवडीचा टप्पा पार झाला असल्याची माहिती त्यांनी दिली. ही मोहीम आता जगभर पसरल्याचं ते म्हणाले.

आज राष्ट्रीय छात्रसेना दिवस असल्याचं स्मरण प्रधानमंत्र्यांनी केलं. राष्ट्रीय छात्रसेनेमुळे युवा वर्गात शिस्त, नेतृत्व आणि सेवेची भावना रुजते, असं ते म्हणाले. विकसित भारताच्या जडणघडणीत युवा वर्गाची भूमिका मोठी आणि महत्वाची असणार आहे, असं ते म्हणाले…

**होल्ड- बाईट - प्रधानमंत्री**

येत्या १२ जानेवारीला स्वामी विवेकानंद यांच्या १६२ व्या जयंतीदिनी साजरा होणाऱ्या असलेल्या युवा दिनाच्या निमित्तानं दिल्लीत ११ आणि १२

जानेवारी रोजी दिल्लीत भारत मंडपम इथं विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग या उपक्रमाअंतर्गत युवा मेळाव्याचं आयोजन केलं असल्याची माहिती त्यांनी दिली. या मेळाव्यात देशाच्या तळागाळातून निवडलेले दोन हजार तरुण - तरुणी सहभागी होणार आहेत. या उपक्रमातून युवा वर्गाला त्यांच्या कल्पना मांडायची संधी मिळेल तसंच त्या प्रत्यक्षात साकारण्यासाठी कृती आराखडाही तयार करता येईल, आपण सारे मिळून देश घडवू या आणि देशाचा विकास करू या, असं आवाहन त्यांनी केलं.

पुस्तकं माणसाची सर्वात जास्त चांगली मित्र असतात आणि ग्रंथालयं ही मैत्री घट्ट करणारी उत्तम जागा असतात, असं सांगत देशभरात ग्रंथालयांची सोय उपलब्ध करून देण्यासाठी सामान्य नागिराकांकडून होत असलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी दिली. नागरिकांनी आपलं जीवनमान बदलण्यासाठी पुस्तकांशी मैत्री वाढवण्याचं आवाहन त्यांनी केलं.

यावेळी प्रधानमंत्र्यांनी पर्यावरण, वन्य जीव संवर्धन तसंच स्वच्छतेचं महत्व आणि त्यादृष्टीनं होत असलेल्या प्रयत्नांचा उल्लेख केला. यानिमित्तानं त्यांनी अक्षरा आणि प्रकृति या मुंबईतल्या दोन मुली आपल्या सहकाऱ्यांसोबत चिंध्यांपासून फॅशनचे कपडे तयार करत असल्याचं सांगत, त्यांच्या उपक्रमाची प्रशंसा केली….

**होल्ड- बाईट - प्रधानमंत्री**

अशा प्रयत्नांमुळे देशाच्या स्वच्छता मोहिमेला चालना मिळते, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीच्या दणदणीत विजयानंतर महाराष्ट्रात सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. राज्यात सरकार स्थापन करण्याविषयी महायुतीचे सर्व घटक पक्ष मिळून चर्चा करू, असं

शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. महायुतीमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटप करताना कोणतेही मतभेद नव्हते. त्यामुळे सत्तास्थापन करतानाही मतभेद नाहीत असं ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत त्यांची पक्षाच्या गटनेतेपदी निवड झाली.

**<><><><>**

झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते हेमंत सोरेन यांची इंडिया आघाडीच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड झाल्यानंतर त्यांनी आज झारखंडचे राज्यपाल संतोष गंगवार यांची भेट घेतली आणि राज्यपालांनी त्यांना सरकार स्थापन करण्याचं निमंत्रण दिलं. तत्पूर्वी सोरेन यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. नव्या सरकारचा शपथविधी २८ नोव्हेंबरला होईल, अशी माहिती त्यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली. ८१ सदस्यांच्या झारखंड विधानसभेत इंडिया आघाडीला ५६ जागा मिळाल्या आहेत, तर भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीला २४ जागांवर विजय मिळाला आहे.

**<><><><>**

संसदेच्या उद्यापासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात सरकार कोणत्याही मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी तयार असल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज सांगितलं. नवी दिल्लीत सरकारनं बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. अधिवेशनादरम्यान लोकसभा आणि राज्यसभेचं कामकाज सुरळीत पार पाडायचं आवाहन रिजिजू यांनी विरोधी पक्षांना केलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक झाली. ३० विविध राजकीय पक्षांचे ४२ नेते या बैठकीला उपस्थित होते. यावेळी

आलेल्या सर्व सूचनांचा कामकाज सल्लागार समितीमधे विचार केला जाईल, असं रिजीजू यांनी सांगितलं.

एका उद्योजकाचं कथित लाच प्रकरण, मणिपूरमधली स्थीती, बेरोजगारी, उत्तर भारतातलं प्रदुषण इत्यादी विषयांवर चर्चेची मागणी काँग्रेसने केली असल्याचं या बैठकीला उपस्थित असलेले काँग्रेसचे खासदार प्रमोद तिवारी यांनी सांगितलं. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनीही सदस्यांना सभागृहात संसदीय शिष्टाचाराचं पालन करायचं आवाहन केलं आहे.

हे अधिवेशन उद्यापासून २० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. मात्र, २६ नोव्हेंबरला संविधान दिनानिमित्त कामकाज होणार नाही.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात पर्थ इथं सुरू असलेल्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात, तिसऱ्या दिवसअखेर विजयासाठी ५३४ धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावात ३ बाद १२ धावा झाल्या आहेत.

आज सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारतानं आपल्या दुसऱ्या डावात कालच्या बिनबाद १७२ या धावसंख्येत आणखी ३१५ धावांची भर घालत ६ बाद ४८७ या धावसंख्येवर डाव घोषित केला. पहिल्या डावात भारतानं ४६ धावांची आघाडी मिळवली होती.

काल ९० धावांवर नाबाद असलेल्या यशस्वी जयस्वालनं शतक पूर्ण करत १६१ धावांची खेळी केली, तर एक के.एल. राहुल ७७ धावा करून बाद झाला. या दोघांनी सलामीसाठी २०१ धावांची भागिदारी केली. त्यानंतर आलेल्या विराट कोहलीनंही कसोटी क्रिकेट कारकिर्दीतलं ३० वं शतक झळकावत नाबाद १०० धावांची खेळी केली.

विजयासाठी ५३४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना दुसऱ्या डावातही ऑस्ट्रेलियालाची फलंदाजी गडगडली. जसप्रित बुमराहनं २, तर मोहम्मद सिराजनं १ गडी बाद केला. आजचा खेळ थांबला, तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या ३ बाद १२ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

ओदिशाला संपन्न सांस्कृतिक वारसा लाभला असून हे राज्य भारताच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असे गौरवोद्गार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काढले. नवी दिल्ली इथं आयोजित ओदिशा पर्व २०२४ या कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमात उभारलेल्या स्टॉल्सना प्रधानमंत्र्यांनी भेट दिली. नवी दिल्लीतल्या उडिया समाजाच्या विश्वस्त मंडळातर्फे आयोजित या कार्यक्रमात ओदिशाच्या वारशाचं जतन आणि संवर्धन केलं जातं.

**//<><><><><>//**